देशोन्नती दि. 8.10.25

# स्थानिक गुन्हे शाखेच्या कारवाईत आरोपी जेरबंद; तीन लाखांचा ऐवज जप्त



देशोन्नती वृत्तसंकलन

**नांदेड :** स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ७ ऑक्टोबर रोजी केलेल्या कारवाईत शहरातील नमस्कार चौकात घरफोडी प्रकरणातील आरोपीस जेरबंद केले असून त्याच्याकडून सोन्याचे दागिने, नगदी रक्कम व मोबाईल असा एकूण २ लाख ९३ हजार ४६० रुपये किमतीचा ऐवज जप्त केला.

पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी माली गुन्हे करणाऱ्या आरोपीचा शोध घेवून गुन्हे उघडकीस आणण्याचे आदेश स्थागुशाचे पोनि उदय खंडेराय यांना दिले आहेत. त्या अनुषंगाने पोनि उदय खंडेराय यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक महेश कोरे व त्यांची टिम उपविभाग नांदेड शहर, इतवारा भागात ७ ऑक्टोबर रोजी पेट्रोलींग करीत असताना ते नमस्कार चौक येथे आले असता एक इसम नांदेड येथे सोने विक्रीसाठी येत असल्याची माहिती मिळाली. या माहितीवरून सदर ठिकाणी छापा कार्यवाही केली असता तेथे इसम करण लोच्या संगेवाड (१९) रा. बोधडी ता. किनवट हा मिळून आला. त्यास ताब्यात घेवुन त्याची अंगझडती घेतली असता त्याच्या पॅन्टच्या खिशात कागदात गुंडाळलेले सोन्या चांदीचे दागीने, नगदी रक्कम व मोबाईल असा एकूण २ लाख ९३ हजार ४६० रुपयाचा मुद्देमाल मिळुन आला. त्याच्याकडे असलेल्या दागिन्याबाबत विचारले असता सोन्याचे बिल नसल्याचे सांगून उडवा उडवीचे उत्तरे देवु लागला. त्यास अधिक विश्वासात घेवुन विचारपुस केली असता त्याने अंदाजे दोन महीण्यापुर्वी सिध्दार्थनगर, गोकुंदा ता. किनवट व अवापा नगर किनवट येथील घरात प्रवेश करुन सदर सोन्याचे दागीने चोरी केल्याचे सांगीतले. त्यावरुन किनवट येथील अभिलेखाची पाहणी केली असता गुन्हा दाखल असल्याचे निष्पन्न झाले. सदर गुन्ह्यातील निष्पन्न आरोपी व मुद्देमाल पुढील कार्यवाहीसाठी किनवट पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. या कारवाई पथकात पोउपनि महेश कोरे, पोकॉ श्रीराम दासरे, माधव माने, संघरत्न गायकवाड, महेश बडगु, देवकत्ते , सायबर सेलचे राजू सिटीकर, दीपक ओढणे यांचा समावेश होता.